kotak
Kotak Mahindra Bank
कोटक महिन्द्रा बँक

# सामान्य माणसासाठी बँकिंग

## 01

**मी बँकेचे खाते कसे उघडू शकतो?**



हे अतिशय सोपं आहे. बँकेचे खाते उघडण्यासाठी तुम्ही 'ओळखीचा पुरावा आणि पत्ता' द्यावा आणि त्यासोबत अलीकडचा एक फोटो जोडावा.

## 02

**'ओळखीचा पुरावा' आणि 'पत्त्याचा पुरावा' म्हणून मी कोणती कागदपत्रे द्यावीत?**



पासपोर्ट, ड्रायव्हिंग लायसन्स, मतदाता ओळखपत्र, यूआयडीएआयने जारी केलेले आधार कार्ड आणि नरेगा कार्ड ही कागदपत्रे 'ओळखीचा पुरावा' म्हणून देऊ शकता. जर ह्या कागदपत्रावर तुमचा पत्ताही असेल तर तर 'ओळखीचा पुरावा आणि पत्ता' ह्या दोन्हीसाठी ते देऊ शकता.




## 03

**जर मी चेन्नईमध्ये राहात आहे आणि माझा पत्त्याचा पुरावा नवी दिल्लीचा आहे, तरीही मी चेन्नईमध्ये खाते उघडू शकतो का?**



हो, नक्कीच. नवी दिल्लीतील तुमच्या पत्त्याच्या पुराव्यासह तुम्ही संपर्काच्या हेतूसाठी चेन्नईतील पत्ता घोषित करावा.

## 04

**बँकेला ओळखीचा आणि पत्त्याचा पुरावा का लागतो?**



बँकेला नो यूअर कस्टमरचा (केव्हायसी) भाग म्हणून ओळखीचा पुरावा आणि पत्ता हवा असतो, जेणेकरून बँक आपल्या ग्राहकांना नीट ओळखू शकेल.

## 05

**जर माझ्याकडे 'ओळखीचा पुरावा' म्हणून एकही कागदपत्र नसेल तर मी काय करू? मी तरीही बँकेचे खाते उघडू शकेन का?**



हो, उघडू शकता. तुमचा अलीकडचा फोटो देऊन आणि बँकेच्या अधिकाऱ्यांसमोर तुमची स्वाक्षरी करून किंवा अंगठ्याचा ठसा देऊन, तुम्ही 'स्मॉल अकाउंट' नावाचे खाते उघडू शकता. पण ह्या 'स्मॉल अकाउंट्स' ना काही मर्यादा असतात, उदाहरणार्थ: कोणत्याही वेळी शिल्लक रक्कम रु.50,000 पेक्षा जास्त नसावी, एका वर्षात एकूण क्रेडिट रु.1,00,000 पेक्षा जास्त नसावे आणि एका महिन्याला रु.10,000/- पेक्षा जास्त एकूण रक्कम काढू नये.

RESERVE BANK OF INDIA
भारतीय रिज़र्व बैंक

## 06

**मला माझ्या खात्यावर कोणत्याही मर्यादा नकोत. पण माझ्या ओळखीचा पुरावा दाखवणारा एकही कागद माझ्याकडे नसेल तरीही मी बँकेचे खाते उघडू शकतो का?**



हो, तरीही तुम्ही खाते उघडू शकता. त्यासाठी बँकेने तुम्हाला 'लो रिस्क' ग्राहकाचा दर्जा दिलेला असावा. तुम्ही खालील कागदपत्रांपैकी कोणतेही एक सादर करू शकता:
(i) केंद्र/राज्य सरकारी विभागाने, वैधानिक/नियामक मंडळाने, खासगी क्षेत्राने, शेड्यूल्ड व्यावसायिक बँकेने, आणि सार्वजनिक आर्थिक संस्थेने जारी केलेले, फोटो असलेले ओळखीचे कार्ड;
किंवा
(ii) गॅझेटेड अधिकाऱ्यांनी तुमचा फोटो अटेस्टेड करून दिलेले पत्र.

KMBL / Aug 2023 / V 1.0